।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव-४२५००१**
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001
**EPABX :**( 0257) 2258428-38 **Fax No:** 0257-2258403 **Gram:** UTTAMVIDYA

Grade - B (2.88)
(NAAC Re-Accredited)

जा.क्र.उमवि/२१/बी.एड./बी.पी.एड./३८१ /०९ दिनांक:२३/१२/२००९

**प्रति,**
**मा.प्राचार्य,**
उ.म.वि.शी.संलग्नीत सर्व
शिक्षणशास्त्र /शारिरीक शिक्षणशास्त्र
महाविद्यालये यांना,

**विषय:- बी.एड्. व बी.पी.एड्. या नवीन अभ्यासक्रमांतर्गत वार्षीक संगणक व पाठाचा समावेश करणे बाबत...**

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने बी.एड्. व बी.पी.एड्. या अभ्यासक्रमांतर्गत वार्षीक संगणक व पाठ परीक्षांचा नवीन पॅटर्न नुसार शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून पुनश्च समावेश करणे संदर्भात मा.विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतनेल्या निर्णयानुसार व मला प्राप्त आदेशान्वये आपणस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून बी.एड्. व बी.पी.एड्. या अभ्यासक्रमांतर्गत वार्षीक संगणक व पाठ परीक्षां नवीन पॅटर्न नुसार लागु करण्यात येत असून त्याची रूपरेषा खालील प्रमाणे असेल.

१. मा. विद्यापरिषदेच्या ठरावानुसर प्रत्येक विद्यार्थ्याची परीक्षा प्रत्येक मेथडसाठी २० मिनिटांची राहील व संगणकाची परीक्षा १५ मिनिटांची राहील. अशा रितीने एका विद्यार्थ्यासाठी एका तासाची परीक्षा घ्यावी व परीक्षेचा कालावधी सकाळी ०९.०० ते ०१.०० व दुपारी ०२.०० ते ५.०० असा राहील व दिवसाला सात बॅचेस असतील. परीक्षेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे तीन भाग करण्यात यावेत Math & Sci. / Languages /Social Sciences. असे तीन भाग करण्यात यावेत प्रत्येकासाठी एक अंतर्गत व एक बहि:स्थ परीक्षकाची नेमणूक करण्यात यावी. अंतर्गत परीक्षकांची नियुक्ती संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्यांनी करावी व बहि:स्थ पर्यवक्षकाची नियुक्ती विद्यापीठ स्तरावर करण्यात यावी. यासाठी ३२ (५) (अ) समितीची त्वरीत बैठक बोलविण्यात यावी व सदर समितीने दिनांक २५ डिसेंबर, २००९ चे आत गोपनीय विभागाकडे पॅनल द्यावे व गोपनिय विभागाने ते दिनांक ३१ डिसेंबर, २००९ चे आत त्याची माहिती शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांचेकडे द्यावी. तसेच सदर समितीने कोणत्या महाविद्यालयांना कोणते परीक्षक द्यावेत अशा पाच-पाच प्राध्यापकांची महाविद्यालय निहाय नावे द्यावेत.

२. परीक्षा शुल्कात रु. १००/- मात्रची वाढ करण्यात यावी. त्या शुल्कास "पाठ परीक्षा शुल्क" असे संबोधण्यात यावे.

३. परीक्षेत गुणदानासाठी विद्यापीठाचे पत्र क्र. उमवि/२९/बीओएस/३४४/२००९ दिनांक २६ ऑक्टोबर, २००९ नुसार प्राचार्यांची एक दिवसीय शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमावर आधारीत प्राचार्यांची कार्यशाळा श्री सुरुपसिंग हिऱ्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर येथे झालेल्या कार्यशाळेनुसार बी.एड.व बी.पी.एड्.या नवीन अभ्यासक्रमांतर्गत पाठ परीक्षांचा समावेश करण्यात आला. त्यानुसार सदर परीक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे असेल.

## बी.एड् - संगणक व पाठ परीक्षा

अ)

- आशययुक्त अध्यापन पध्दतीनुसार पाठ टाचण व अहवाल गुण - १०
- पाठावर आधारीत पॉवर पॉईट तयार करणे गुण - १०
- पाठावर आधारीत पॉवर पॉईंटचे सादरीकरण करणे गुण - १०
- पाठावर आधारीत मौखिक परीक्षा गुण - १५

ब)

- संगणक प्रात्यक्षिक मौखिक परीक्षा गुण - १०

यानुसार अंतर्गत व बहि:स्थ परीक्षकांचे स्वतंत्रपणे गुणदान करुन खालील प्रपत्रात विद्यापीठाला सी.डी. व हार्ड कॉपी विद्यापीठाच्या नियमानुसार सादर करावेत. "ब" भागातील संगणक प्रात्यक्षिक कार्याचे कोणत्याही एका अध्यापन पध्दतीच्या परीक्षेच्या वेळी मूल्यमापन करावे

- सदर पाठाचे मूल्यमापन करण्यासंदर्भात तयार केलेला आराखडा :

Format of Marklist to be submitted to University

- महाविद्यालयाचे नाव :- ----------------------------------------------

| अ.क्र. | परीक्षा क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | अ | | | | ब | एकूण गुण २०० पैकी | अंतिम गुण ५० पैकी | बैठक क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अध्यापक पध्दती ०१ | | अध्यापन पध्दती ०२ | | संगणक प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा २० गुण (१०+१०) | | | |
| | | | अंतर्गत परीक्षक ४५ पैकी गुण | बहि:स्थ परीक्षक ४५ पैकी गुण | अंतर्गत परीक्षक ४५ पैकी गुण | बहि:स्थ परीक्षक ४५ पैकी गुण | | | | |
| | | | | | | | | | | |

अंतर्गत परीक्षकाचे नांव व स्वाक्षरी बहिस्थ परीक्षकाचे नांव व स्वाक्षरी

दिनांक :- / /

## *बी.पी. एड् - संगणक व पाठ परीक्षा

Format of Marklist to be submitted to University

* महाविद्यालयाचे नाव :- ----------------------------------------------

| अ.क्र. | परीक्षा क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | अध्यापक पध्दती ०१ शालेय विषय पाठ | | अध्यापन पध्दती ०२ शाररिीक शिक्षण पाठ | | एकूण गुण २०० पैकी | अंतिम गुण ५० पैकी | बैठक क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अंतर्गत परीक्षक ५० पैकी गुण | बहि:स्थ परीक्षक ५० पैकी गुण | अंतर्गत परीक्षक ५० पैकी गुण | बहि:स्थ परीक्षक ५० पैकी गुण | | | |
| | | | | | | | | | |

अंतर्गत परीक्षकाचे नांव व स्वाक्षरी बहिस्थ परीक्षकाचे नांव व स्वाक्षरी

दिनांक :- / /

-३-

* टिप : बी.पी.एड. अभ्यासक्रमानुसार विद्यार्थी शिक्षकांची विद्यापीठ संगणक व पाठ परीक्षा खालील प्रमाणे घेण्यात यावी. यात शालेय विषय पाठाची परीक्षा संगणकाचा वापर करुन पावर पॉईन्ट प्रेझेंटेशन तयार करावे त्यात खालील घटकांचा समावेश असावा.

- आशययुक्त अध्यापन पध्दतीनुसार पाठ टाचण व अहवाल गुण - १०
- पाठावर आधारीत पॉवर पॉईट तयार करणे गुण - १०
- पाठावर आधारीत पॉवर पॉईटचे सादरीकरण करणे गुण - १०
- पाठावर आधारीत मौखिक परीक्षा गुण - २०

तसेच शारीरिक शिक्षण पाठ परीक्षेचे स्वरुप पूर्वी प्रमाणे असून यात या पाठाचे टाचण तयार करुन प्रात्यक्षिक परीक्षा क्रिडागंणावर घेण्यात यावी.

दरवर्षी बी.एड्. व बी.पी.एड्. या अभ्यासक्रमांतर्गत वार्षिक संगणक व पाठ परीक्षा ह्या दिनांक १५ फेब्रुवारी ते १५ मार्च या कालावधीत घेण्यात याव्यात

तरी वरील प्रमाणे वार्षीक संगणक व पाठ परीक्षांबाबत योग्यती कार्यवाही करून सदरची बाब सर्व संबधीतांच्या निदर्शनात आणून द्यावी ही विनंती .

आपला

sd/-
( सु..ब. पाठक )
सहा.कुलसचिव
अभ्यासमंडळ विभाग

**प्रत माहितीसाठी** :-

1) मा.कुलगुरुंचे कार्यकारी सहाय्यक, उ.म.वि., जळगांव
2) मा.अधिष्ठाता, जयहिंद महाविद्यालय, धुळे
3) मा.कुलसचिव कार्यालय, उ.म.वि., जळगांव
4) मा.वित्त व लेखा अधिकारी, उ.म.वि., जळगांव
5) मा. परीक्षा नियंत्रक,परीक्षा विभाग उ.म.वि., जळगाव.

D:\JNSURL\EDUCATION FACULTY\Education All BOS.doc